# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ प्रभाग समिती

## सभावृत्तांत [ कार्यपत्रिका क्रमांक १० ]

**दिनांक : १७ /१२/२०१६** **वेळ : दुपारी १२.०० वा.**

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे डिसेंबर २०१६ ची मासिक सभा शनिवार दिनांक १७/१२/२०१६ रोजी दु. १२.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील " **राजमाता जिजाऊ सभागृह** " येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. पांढरकर निलेश शंकरराव | सभापती |
| 2. | मा. पात्रे राम संभाजी | सदस्य |
| 3. | मा. बाबर शारदा प्रकाश | सदस्या |
| 4. | मा. सुभद्रा ईश्वर ठोंबरे | सदस्या |
| 5. | मा. भारती फरांदे | सदस्या |
| 6. | मा. आर.एस.कुमार | सदस्य |
| 7. | मा. जावेद रमजान शेख | सदस्य |
| 8. | मा. भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर | सदस्या |
| 9. | मा. राजू मिसाळ | सदस्य |
| 10. | मा. तरस बाळासाहेब जयवंत | सदस्य |
| 11. | मा. पवार मनिषा काळुराम | सदस्या |
| 12. | मा. प्रसाद शेट्टी | सदस्य |
| 13. | मा. सुजाता अविनाश टेकवडे | सदस्या |
| 14. | मा. काळभोर वैशाली जालिंदर | सदस्या |
| 15. | मा. सतिश झांबरे | स्वीकृत सदस्य |
| 16. | मा. बेबीनंदा राम भोंडवे | स्वीकृत सदस्या |
| 17. | मा. गिरीष कुटे | स्वीकृत सदस्य |

तसेच श्रीम. आशादेवी दुरगुडे - मा. क्षेत्रीय अधिकारी, श्री संजय खाबडे – मा. कार्यकारी अभियंता, विदयुत , श्री विशाल कांबळे , मा. कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा , श्रीम.रेखा गाडेकर – प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्रीम एल.एस.बाबर - उपअभियंता, विदयुत, श्री संजय काशीद – उपअभियंता, पाणीपुरवठा, श्री. महादेव शिंदे – सहा. आरोग्याधिकारी, इ. उपस्थित होते.

मा. सभापती, श्री. पांढरकर निलेश यांनी उपस्थित सन्मा. नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करुन सभा सुरु करणेस अनुमती दिली.

त्यानंतर मागील सभेचा सभावृत्तांत [ दि. ३०/११/२०१६ कार्यपत्रिका क्रमांक ९ ] वाचून कायम करणेत आला. मा. सभापती यांचे परवानगीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

**विषय क्रमांक १** : मा**.** क्षेत्रीय अधिकारी**,** अ क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील दि**.** १५**/**१२**/**२०१६ रोजीचा प्रस्ताव

अ क्षेत्रीय कार्यालय आरोग्य विभागाचे सन २०१६-१७ चे मुळ अंदाजपत्रकामधील हॉटेल वेस्ट वाहतूक खर्च या लेखाशिर्षामधील र**.**रु २**,**००**,**०००**/-** इतकी तरतूद औष्णिक धुरीकरणासाठी इंधन खर्च या लेखाशिर्षामध्ये वर्ग करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे**.**

**विषय क्रमांक २** : मा**.** सदस्या सुभद्रा ठोंबरे यांचा दि**.** १७**/**१२**/**२०१६ रोजीचा प्रस्ताव

1. ठराव क्रमांक ५१ विषय क्रमांक २५ दि**.** १०**/**८**/**२०१२ फुले-शाहू-आंबेडकर नगर बिल्डींग नंबर ए-३ समोरील स्टेज
2. ठराव क्रमांक १५८ विषय क्रमांक ९ दि**.** ८**/**५**/**२०१३ माता रमाबाई आंबेडकर शाळा अंजठानगरची आरसीसी कमान
3. ठराव क्रमांक ६६ विषय क्रमांक ४ दि**.** ३०**/**११**/**२०१६ भारतरत्न डॉ**.** बाबासाहेब आंबेडकर प्रवेशव्दार अजंठानगर

इत्यादी ठराव मंजुर झाले आहेत**.** तरी त्यावर सौजन्य **सौ**. **सुभद्राताई ईश्वर ठोंबरे** असे नाव टाकणेबाबतचे उपसुचनेवर विचार करणे**.**

**विषय क्रमांक ३** : मा**.** सदस्या सुभद्रा ठोंबरे यांचा दि**.** १७**/**१२**/**२०१६ रोजीचा प्रस्ताव
प्रभाग क्रमांक १० मधील अमृतानंदमयी बिल्डींग नंबर १ ते ११ व गती ट्रान्सपोर्टच्या मधून व मशिदीच्या समोरुन कस्तुरी मार्केटपर्यंत जाणा-या रोडला **मा**. **ईश्वर ठोंबरे**, **माजी नगरसेवक मार्ग** असे नामकरण करणेबाबत विचार करणे**.**

**विषय क्रमांक ४** : मा**.** सदस्य बाळासाहेब तरस यांचा दि**.** १७**/**१२**/**२०१६ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक १८ किवळे येथे बहुउद्देशिय इमारतीचे भूमिपूजन झाले असून नियोजित इमारतीमधील दवाखान्याला **कै. जयंवतराव वामनराव तरस दवाखाना** तसेच सांस्कृतिक भवनास **कै. सौ. गंगुबाई किसनराव नेटके [ मा. सदस्य पंचायत समिती हवेली ] सांस्कृतिक भवन** असे नामकरण करणेबाबत विचार करणे.

**विषय क्रमांक ५**:मा**.** सदस्य बाळासाहेब तरस यांचा दि**.** १७**/**१२**/**२०१६ रोजीचा प्रस्ताव
प्रभाग क्रमांक १८ किवळे येथील कै. मल्हारराव विठोबा तरस प्राथमिक शाळा, विकासनगर येथील शाळेला श्री शंकरराव व रामचंद्र गणपत तरस यांनी स्वत:च्या मालकीची जागा विनामोबदला शाळेला दिलेली असून शाळेच्या जागेचा ७/१२ सुध्दा त्यांचे नावे आहे. सदर परिवाराचे विनंतीनुसार सदर शाळेच्या पार्कींगची मोकळी जागा **कराटे प्रशिक्षणाला** देण्यासाठी संध्याकाळी ६ ते ८ या वेळेत श्री विशाल शंकर तरस यांना विनामोबदला कराटे प्रशिक्षणाकरीता देणेसाठी मान्यता देणेबाबत विचार करणे.

वरील प्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेण्यात आले.

ठराव क्रमांक : ८४ विषय क्रमांक : १

दिनांक : १७/१२/२०१६ विभाग : आरोग्य

सुचक : मा. प्रसाद शेट्टी अनुमोदक : मा. बाळासाहेब तरस

संदर्भ : मा. क्षेत्रीय अधिकारी, अ क्षेत्रीय कार्यालय यांचा दि. १५/१२/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ क्षेत्रीय कार्यालय आरोग्य विभागाचे सन २०१६-१७ चे मूळ अंदाजपत्रकामध्ये **औष्णिक धुरीकरणासाठी इंधन खर्च** या लेखाशिर्षावर र.रु.३,५०,०००/-इतकी तरतूद उपलब्ध आहे. या मधून डास प्रतिबंधक उपाययोजनेकरीता औष्णिक धुरीकरणासाठी आवश्यक डिझेल खरेदीसाठी करणेत येतो. माहे नोंव्हेबर २०१६ अखेर यापैकी र.रु. ३,४७,९७४/- इतका खर्च झालेला असून र.रु. २,०२६/- इतकी तरतूद शिल्लक आहे. माहे डिसेंबर २०१६ ते फेब्रुवारी २०१७ अखेर या कालावधीसाठी प्रत्यक्ष होणारा खर्च विचारात घेता र.रु. २,००,०००/- इतकी तरतूद कमी पडणार आहे. याकरीता अ क्षेत्रीय कार्यालयाचे आरोग्य विभागाकडील सन २०१६-१७ चे मुळ अंदाजपत्रकातील हॉटेल वेस्ट वाहतूक खर्च या लेखाशिर्षावरील र.रु. २५,००,०००/- मधून र.रु. २,००,०००/- इतकी तरतूद ऑष्णिक धुरीकरणासाठी इंधन खर्च या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक : ८५ विषय क्रमांक : २

दिनांक : १७/१२/२०१६ विभाग :

सुचक : मा. सुभद्रा ठोंबरे अनुमोदक : मा. जावेद शेख

संदर्भ : सन्मा. सदस्या सुभद्रा ठोंबरे यांचा दि. १७/१२/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

1. ठराव क्रमांक ५१ विषय क्रमांक २५ दि. १०/८/२०१२ फुले-शाहू-आंबेडकर नगर बिल्डींग नंबर ए-३ समोरील स्टेज
2. ठराव क्रमांक १५८ विषय क्रमांक ९ दि. ८/५/२०१३ माता रमाबाई आंबेडकर शाळा अंजठानगरची आरसीसी कमान
3. ठराव क्रमांक ६६ विषय क्रमांक ४ दि. ३०/११/२०१६ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेशव्दार अजंठानगर

इत्यादी ठराव मंजुर झाले आहेत. तरी त्यावर **सौजन्य सौ. सुभद्राताई ईश्वर ठोंबरे** असे नाव टाकणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक : ८६ विषय क्रमांक : ३

दिनांक : १७/१२/२०१६ विभाग :

सुचक : मा. सुभद्रा ठोंबरे अनुमोदक : मा. जावेद शेख

संदर्भ : सन्मा. सदस्या सुभद्रा ठोंबरे यांचा दि. १७/१२/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १० मधील अमृतानंदमयी बिल्डींग नंबर १ ते ११ व गती ट्रान्सपोर्टच्या मधून व मशिदीच्या समोरुन कस्तुरी मार्केटपर्यंत जाणा-या रोडला **मा. ईश्वर ठोंबरे, माजी नगरसेवक मार्ग** असे नामकरण करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक : ८७ विषय क्रमांक : ४

दिनांक : १७/१२/२०१६ विभाग :

सुचक : मा. बाळासाहेब तरस अनुमोदक : मा. सुजाता टेकवडे

संदर्भ : सन्मा. सदस्य बाळासाहेब तरस, सदस्या सुमनताई नेटके यांचा

दि. १७/१२/२०१६ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक १८ किवळे येथे १५ दिवसांपुर्वी बहुउद्देशिय इमारतीचे भूमिपूजन झाले असून सदर नियोजित इमारतीमधील दवाखान्याला **कै. जयंवतराव वामनराव तरस दवाखाना** तसेच सांस्कृतिक भवनास **कै. सौ. गंगुबाई किसनराव नेटके [ मा. सदस्य पंचायत समिती हवेली ] सांस्कृतिक भवन** असे नामकरण करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक : ८८ विषय क्रमांक : ५

दिनांक : १७/१२/२०१६ विभाग :

सुचक : मा. बाळासाहेब तरस अनुमोदक : मा. सुजाता टेकवडे

संदर्भ : सन्मा.सदस्य बाळासाहेब तरस सदस्या सुमनताई नेटके यांचा

दि. १७/१२/२०१६ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक १८ किवळे येथील कै. मल्हारराव विठोबा तरस प्राथमिक शाळा विकासनगर येथील शाळेला श्री शंकरराव व रामचंद्र गणपत तरस यांनी स्वत:च्या मालकीची जागा बिनामोबदला शाळेला दिलेली असून शाळेच्या जागेचा ७/१२ सुध्दा त्यांचे नावे आहे. सदर परिवाराचे विनंतीनुसार सदर शाळेच्या पार्कींगची मोकळी जागा कराटे प्रशिक्षणाकरीता देण्यासाठी संध्याकाळी ६ ते ८ या वेळेत श्री विशाल शंकर तरस यांना विनामोबदला कराटे प्रशिक्षणाकरीता देणेसाठी मान्यता येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

वरील प्रमाणे अ प्रभाग समितीच्या मासिक सभेचे कामकाज होऊन मा. सभापती निलेश पांढरकर यांनी **वरील मंजुर ठरावांवर सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता कार्यवाही सुरु करणेच्या सुचना देऊन** प्रस्तुतची सभा संपलेचे जाहीर केले.

सही/-
**(निलेश शंकरराव पांढरकर)**
**सभापती**
**अ प्रभाग समिती**

क्र. अक्षेका /११/कावि/४४२/२०१६
दि. २३/१२/२०१६

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती
निगडी - ४४

प्रति,
सर्व संबंधित विभाग